ग्रंथमालिका ‘बालसंस्कार’ : खंड ७

# टी.व्ही., मोबाईल आणि इंटरनेट यांच्या दुष्परिणामांपासून मुलांना वाचवा !

मराठी (Marathi)


**संकलक**

**हिंदु राष्ट्राच्या स्थापनेचा उद्घोष करणारे**

**सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले**

**पू. संदीप गजानन आळशी**



सनातन संस्था

प्रस्तुत पुनर्मुद्रणाच्या २,००० प्रती आणि
या लघुग्रंथाच्या आतापर्यंत ३८,३०० प्रती प्रकाशित !

# सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या अद्वितीय कार्याचा संक्षिप्त परिचय

१. अध्यात्माच्या प्रसारासाठी ‘सनातन संस्थे’ची स्थापना !

२. ‘गुरुकृपायोग’ या साधनामार्गाचे जनक !

३. हिंदु राष्ट्राच्या (ईश्वरी राज्याच्या) स्थापनेचा उद्‌घोष (वर्ष १९९८)

४. ग्रंथ-निर्मिती : एप्रिल २०२४ पर्यंत ३६५ ग्रंथांच्या १३ भाषांत ९६ लाख ५४ सहस्र प्रती !

५. शारीरिक, मानसिक, तसेच वाईट शक्तींच्या त्रासांवरील उपायपद्धतींविषयी संशोधन

६. ‘सनातन प्रभात’ नियतकालिकांचे संस्थापक-संपादक !

७. ‘हिंदु राष्ट्रा’च्या स्थापनेसाठी संत, संप्रदाय, हिंदुत्ववादी आदींचे संघटन आणि त्यांना दिशादर्शन !

**(संपूर्ण परिचयासाठी वाचा – ‘www.Sanatan.org’.)**

# सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचे साधकांना आश्वासन !



स्थूल देहा असे स्थळकाळाची मर्यादा ।
कैसे असू सर्वदा सर्वां ठायी ।।
सनातन धर्म माझे नित्य रूप ।
त्या रूपे सर्वत्र आहे सदा ।।

– जयंत बाळाजी आठवले
१७.५.१९९८

---

# परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांच्या उपाधीविषयीचे विवेचन !

१३.७.२०२२ पासून ‘सप्तर्षी जीवनाडीपट्टी’ वाचनाच्या माध्यमातून सप्तर्षींनी आज्ञा केल्याप्रमाणे परात्पर गुरु डॉ. आठवले यांना ‘सच्चिदानंद परब्रह्म’ ही उपाधी लावण्यात येत आहे. असे असले तरी, त्यापूर्वीच्या लिखाणात किंवा आताही साधकांनी लिहून दिलेल्या लिखाणात ‘प.पू.’ किंवा ‘परात्पर गुरु’ अशी उपाधी वापरली असेल, तर ती तशीच ठेवली आहे. F (DrV-Nav)

## मनोगत

‘सनातनच्या ‘बालसंस्कार’ या ग्रंथमालिकेतील ‘टी.व्ही., मोबाईल आणि इंटरनेट यांचे तोटे टाळून लाभ मिळवा !’ हा ग्रंथ मुलांप्रमाणेच पालक आणि शिक्षक यांच्यासाठीही उपयुक्त आहे. असे असतांना ‘प्रस्तुत निराळ्या लघुग्रंथाची आवश्यकता काय ?’, असा प्रश्न काही जणांना पडू शकतो. प्रस्तुत लघुग्रंथाचे उद्देश पुढीलप्रमाणे आहेत.

१. ‘पालक आणि शिक्षक हे मुलांचे ‘प्रथम गुरु’ असतात’, अशी हिंदु संस्कृतीची शिकवण आहे. जिजामाता आणि दादोजी कोंडदेव यांनी शिवबावर लहानपणी चांगले संस्कार केले; म्हणून अवघ्या पंधराव्या वर्षी शिवबाने ‘रांझ्याच्या पाटलाने एका स्त्रीची अब्रू लुटली; म्हणून त्याचे हात-पाय तोडण्याची शिक्षा दिली’ आणि पुढे रामराज्यासम आदर्श असे ‘हिंदवी स्वराज्य’ स्थापन केले. आजचे पालक आणि शिक्षक यांनाही ‘भावी पिढी चारित्र्यसंपन्न, राष्ट्रभक्त आणि धर्मप्रेमी घडवणे’, हे आपले नैतिक आणि राष्ट्रीय दायित्व

आहे’, याची जाणीव प्रकर्षाने व्हावी, हा या लघुग्रंथाचा मुख्य उद्देश आहे.

२. मुले अनुकरणप्रिय असतात. त्यांना संस्कारांचे नुसते उपदेश करून भागत नाही, तर पालकांनी स्वतःही संस्कारयुक्त आचरण करणे आवश्यक असते. त्यांच्या आचरणातून मुलांवर नकळत संस्कार होतात. या दृष्टीने ‘पालकांचे आचरण कसे असावे आणि कसे असू नये’, यांविषयीही या लघुग्रंथात सांगितले आहे.

३. सध्या दूरचित्रवाणी, मोबाईल आणि इंटरनेट या प्रसारमाध्यमांचा कल प्रामुख्याने असंस्कृतपणा, विकृती, अश्लीलता अशासारख्या रज-तमात्मक प्रवृत्तींकडे झुकलेला आहे. त्यामुळे हिंदु धर्म आणि संस्कृती यांची मोठ्या प्रमाणावर हानी होत आहे. हिंदु समाजाला धर्मशिक्षण मिळत नसल्याने भावी पिढी चंगळवादाला इतकी बळी पडली आहे की, ती तिचा धर्मच विसरली आहे. धर्म हा राष्ट्राचा पाया आहे. धर्मच बुडाला, तर राष्ट्र नष्ट व्हायला वेळ लागणार नाही. यासाठीच ‘दूरचित्रवाणी, मोबाईल आणि इंटरनेट

या माध्यमांचा धर्मशिक्षण देण्यासाठी कसा उपयोग करता येईल ?' याविषयीही या लघुग्रंथात सांगितले आहे. याद्वारे 'भारताची आध्यात्मिक परंपरा जपणे', हे पालक आणि शिक्षक यांचे धार्मिक दायित्वच आहे.

४. मुलांवर कुसंस्कार करणारे, तसेच राष्ट्र आणि धर्म यांची हानी करणारे कार्यक्रम दाखवणाऱ्या दूरचित्रवाहिन्यांचे प्रबोधन करणे, त्या प्रबोधनाचा उपयोग न झाल्यास अशा दूरचित्रवाहिन्यांवर बहिष्कार घालणे, यांसारखे प्रयत्न करणे, हे पालक आणि शिक्षक यांचे धर्मकर्तव्यच आहे. याविषयीही या लघुग्रंथात मार्गदर्शन केले आहे.

५. समाजाने 'साधना', म्हणजे 'ईश्वरप्राप्तीसाठी प्रयत्न' केल्यावरच तो सात्त्विक होतो. एकदा व्यक्ती सात्त्विक झाली की, साधनेने मिळणाऱ्या आनंदामुळे ती रज-तमात्मक गोष्टींना बळीच पडत नाही. यासाठी पालक आणि शिक्षक यांनी स्वतः साधना केली पाहिजे. पालक आणि शिक्षक यांनी 'मुलांना साधनेची गोडी का लावावी', हेही लघुग्रंथात सांगितले आहे.

पालक आणि शिक्षक यांनी केवळ हाच लघुग्रंथ वाचला, तर त्यांना लिखाणात अपुरेपणा वाटू शकतो; कारण 'टी.व्ही., मोबाईल आणि इंटरनेट यांचे तोटे टाळून लाभ मिळवा !' या मूळ ग्रंथातील सूत्रांची पुनरावृत्ती या लघुग्रंथात टाळली आहे. यासाठी पालक आणि शिक्षक यांनी मूळ ग्रंथ आणि हा लघुग्रंथ, असे दोन्ही वाचणे आवश्यक आहे.

'हा लघुग्रंथ वाचून पालक आणि शिक्षक यांनी मुलांप्रतीचे स्वतःचे दायित्व आणि कर्तव्ये ओळखून भावी पिढी सर्वदृष्ट्या आदर्श घडवण्याचा प्रयत्न करावा', ही श्री गुरुचरणी प्रार्थना !' – **संकलक**

## सनातनच्या ग्रंथसंपदेचे अद्वितीयत्व !

सनातनच्या बहुतांशी ग्रंथांतील सुमारे २० टक्के लिखाण हे 'सूक्ष्मातून प्राप्त झालेले दिव्य ज्ञान' असून ते पृथ्वीवरील उपलब्ध ज्ञानाच्या तुलनेत अनोखे आहे !

## अनुक्रमणिका

१. आधुनिक प्रसारमाध्यमांमुळे सध्या निर्माण झालेली भयावह कौटुंबिक, सामाजिक अन् सांस्कृतिक स्थिती ११

२. देशाची भावी पिढी घडवण्याचे सामर्थ्य पालक आणि शिक्षक यांच्यात आहे ! १३

३. पालकवर्गाचे दायित्व १३

४. शिक्षकबंधूंचे दायित्व ४३

'सनातन संस्था' स्वभाषाभिमानी आहे. 'स्वभाषारक्षण अन् भाषाशुद्धी चळवळ' राबवण्यासाठी सनातनने ग्रंथमालिकेची निर्मितीही केली आहे. असे असतांनाही लघुग्रंथाच्या शीर्षकात, तसेच लघुग्रंथात काही इंग्रजी शब्द तसेच ठेवले आहेत; कारण तसेच ते व्यवहारात प्रचलित आहेत. या शब्दांना मराठी प्रतिशब्द वापरल्यास ते विशेषतः मुलांना बोजड वाटू शकतील आणि त्यामुळे विषय समजून घेण्यातील त्यांचे स्वारस्य घटू शकेल. हाच यामागील एकमेव उद्देश आहे. आगामी हिंदु राष्ट्रात मात्र या इंग्रजी शब्दांच्या स्थानी स्वकीय शब्दच प्रचलित केले जातील.